# माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान,सांगोला

नोंदणी क्र. F 781

देशपांडे गल्ली,केळकर हॉस्पिटल समोर,
मु.पो. सांगोला,जि. सोलापूर

## एप्रिल ते जून 2025

'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या वतीने माहे एप्रिल ते जून 2025 चे मासिक वृत्त सादर करताना आम्हाला आनंद होत आहे.'

## अ) महिला सबलीकरण

### 1) आरोग्य:

- निजामपूर येथे 24 महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. यातील 2 महिलांमध्ये हिमोग्लोबिन कमी आढळल्याने त्यांना संतुलित आहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
- किशोरी प्रशिक्षिकांचे क्षमता विकसन प्रशिक्षण घेण्यात आले. लाभार्थी – 10 प्रशिक्षिका.

### 2) अन्यायाविरुद्ध संघर्ष:

- महिला समुपदेशन केंद्रात एकूण 166 अर्जांची नोंदणी झाली.
- 6 ठिकाणी मेळावे संपन्न होऊन महिलांमध्ये कायदेशीर साक्षरता व आत्मविश्वास वाढवण्याचे काम करण्यात आले.

### 3) कौशल्य विकसन:

- सांगोला कॉलेजमध्ये 6 व 7 एप्रिल रोजी आयोजित 'सिंचन परिषदेत' संस्थेच्या खाद्यपदार्थ स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
- मेंदी प्रशिक्षण केंद्र सुरु झाले, लाभार्थी – 15 महिला.
- शिलाई प्रशिक्षण वर्गाचा निकाल 86% लागला (पु. अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ).
- 'गुंफण' विक्रीकेंद्राचे उद्घाटन डॉ. दीपक सिद्धावरम यांच्या हस्ते झाले. बचतगटातील महिलांची उत्पादने येथे विक्रीसाठी ठेवण्यात आली.
- केक तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. लाभार्थी – 9 महिला.

### 4) आर्थिक स्वावलंबन:

- बचतगटातील 8 महिलांना 1,60,000/- रूपये अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले.
- कमलापूर येथे आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन करण्यात आले. सौ. वसुंधरा कुलकर्णी यांनी बचतीचे महत्त्व, कर्ज व खर्च व्यवस्थापन या विषयांवर माहिती दिली. लाभार्थी – 32 महिला.

## ब) दर्जेदार शिक्षण

- इयत्ता 10 वी व 12 वी दोन्ही वर्गाचा 100% निकाल लागला. इ. 10 वी चा सलग आठव्या वर्षी 100% निकाल लागला. ही गुणवत्ता टिकवणे ही संस्थेच्या शैक्षणिक दृष्टिकोनाची साक्ष आहे.
- चित्रपदकोष स्पर्धेत 5 विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली (कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ व रवीकीर्ती संस्था).
- उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात 4 थीच्या विद्यार्थ्यांसाठी छंदवर्गाचे आयोजन करण्यात आले.
- विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ आणि 10 वीच्या विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ संपन्न.
- 2007 च्या चौथीच्या तुकडीचा स्नेहमेळावा उत्साहात साजरा झाला.
- नवीन शैक्षणिक वर्ष 2025-26 ची सुरुवात उत्साहात झाली.

## क) जलसंधारण

- 'सेवावार्धिनी' प्रकल्पांतर्गत सांगोला तालुक्यात एकूण 3 जिल्हा परिषद शाळांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगचे काम पूर्ण झाले.

### ❖ प्रशिक्षण

- संस्थेच्या सर्व विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांसाठी 'आर्थिक व्यवस्थापन' या विषयावर प्रशिक्षण घेण्यात आले.

मार्गदर्शक – श्री. श्रीराम पटवर्धन, कार्यकारिणी सदस्य, सेवावर्धिनी, पुणे.

## ❖ मान्यवरांच्या भेटी

- श्री. राजन चिटणीस आणि सौ. संपदा पेठे यांची संस्थेला सदिच्छा भेट.
- प्रसिद्ध कार्डियोलॉजिस्ट डॉ. दीपक सिद्धावरम व सौ. ज्योती सिद्धावरम यांची विद्यार्थ्यांच्या बक्षीस समारंभास उपस्थिती.

काही क्षणचित्रे




कल्याणी प्रशिक्षण



केक प्रशिक्षण



समुपदेशन केंद्रातर्फे जाणीव जागृती मेळावा




10 वी 100 % निकाल
90% च्या पुढे 29
80 ते 90 % च्या मध्ये 25
75 ते 80 % च्या मध्ये 14



उत्कर्ष विद्यालयात शिक्षिकांचे क्षमता प्रशिक्षण संपन्न



'गुंफण उत्पादने विक्रीकेंद्रा' चे उदघाटन